स्थायी समितीच्या सोमवार **दिनांक 09–11–2015** रोजी **सायंकाळी 05–00** वाजता सिव्हील कार्यालयातील डॉ. पंजाबराव देशमुख स्मृति, स्थायी समिती सभागृहात भरलेल्या सभेचा अहवाल.

## उपस्थित सभासद

| | | |
|---|---|---|
| **1.** | **मा. श्री. रमेश माणिकराव सिंगारे** | **सभापती** |
| 2. | मा. श्री. शरद महादेवराव बांते | सदस्य |
| 3. | मा. श्री. संजयकुमार कृष्णराव बालपांडे | सदस्य |
| 4. | मा. श्री. श्रावण तुकाराम खापेकर | सदस्य |
| 5. | मा. श्री. जगतराम सेवकराम सिन्हा | सदस्य |
| 6. | मा. श्री. मो. कामील अंसारी | सदस्य |
| 7. | मा. श्री. किशोर चिंधुजी गजभिये | सदस्य |
| 8. | मा. सौ. निता राजेंद्र ठाकरे | सदस्या |
| 9. | मा. श्री. किशोर रामाजी डोरले | सदस्य |
| 10. | मा. सौ. विशाखा विकास मैंद | सदस्या |
| 11. | मा. सौ. कांता राधेश्याम रारोकर | सदस्या |
| 12. | मा. श्रीमती प्रेरणा बळीराम कापसे | सदस्या |
| 13. | मा. सौ. सरस्वती विजय सलामे | सदस्या |
| 14. | मा. श्री. संदिप प्रल्हाद सहारे | सदस्य |
| 15. | मा. श्री. दिपक मोहन पटेल | सदस्य |

## अनुपस्थित सभासद

| | | |
|---|---|---|
| 1. | मा. श्री. गोपीचंद कृष्णराव कुमरे | सदस्य |

## उपस्थित अधिकारी

1. श्री. आर.झेड. सिद्दीकी, अति. आयुक्त
2. श्री. हरीश दुबे, निगम सचिव

मा. सभापती स्थायी समिती यांनी सभेच्या कार्यवाहीला सुरुवात केली.

ठराव क्रमांक 282:— नागपूर शहर मंजूर विकास योजनेनुसार EP 68 मौजा सिताबर्डी येथील मॉरिस कॉलेज टी पॉईंट ते नागपूर विद्यापीठ पर्यंत 18 मिटर रुंदीचा रस्ता विकसित करण्याबाबत जुना पूल तोडून नवीन पूल बांधण्याच्या कामास्तव प्राप्त निम्नतम निविदापैकी मे. एम.आर. ढोबळे यांची मूळ प्राकलनीय दरापेक्ष 4.96 टक्के अधिक राशी रु. 24773499/— (रुपये दोन कोटी सत्तेचाळी लक्ष त्र्याहत्तर हजार चारशे नव्यानऊ फक्त) निविदा स्वीकृत करण्याचा प्रश्न तसेच, हे काम पद क्र. 652 (A2001370406) अंतर्गत प्रस्तावित असून या कामाकरिता रु. 2,46,64,926/— राशीची तरतूद करण्याचा प्रश्न समितीने विचारात घेऊन त्यास एकमताने मंजूरी प्रदान केली.

<u>ठराव क्रमांक 283</u>:— महानगरपालिकेच्या हॉट मिक्स प्लॉट विभागाद्वारे नागपूर शहरातील रस्त्याची दुरुस्ती व सुस्थितीच्या कामासाठी लेबर पुरवठा करण्याकरीता रू. 6995149/— राशीचे प्राकलनास प्रशासकीय मंजूरी प्रदान करण्याचा व तद्नंतर निविदा बोलविण्याचा प्रश्न समितीने विचारात घेऊन त्यास एकमताने मंजूरी प्रदान केली.

<u>ठराव क्रमांक 284</u>:— लकडगंज झोन क्र. 8 करीता 8000 लिटर क्षमतेची 1 नग सक्शन कम जेटिंग मशीन खरेदी करण्याकरिता प्रभाग समिती ठराव क्र. 05, दि. 20.08.2015 नुसार रु. 42.00 लक्ष प्रावधान पद क्र. A43401171602 मध्ये वळते करण्याची मंजूरी व आरोग्य विभागा तर्फे नमूद पदा अंतर्गत रू. 5.00 लक्ष प्रावधान तरतूद उपलब्ध झाले असे एकूण रु. 47.00 लक्ष प्रावधान तरतूद उपलब्ध झाले आहे. तथापि, लकडगंज झोनच्या वार्ड फडांतून (A42040174602) रु. 42.00 लक्ष आरोग्य विभागाचे पद क्र. A43401171602 मध्ये वळते करण्याच्या प्रस्तावास मान्यता प्रदान करणे व 8000 लिटर क्षमतेची 1 नग जेटिंग कम सक्सन मशीन खरेदी करीता ई—निविदा काढण्याचा प्रश्न समितीने विचारात घेऊन त्यास एकमताने मंजूरी प्रदान केली.

<u>ठराव क्रमांक 285</u>:— प्रभाग क्र. 8 अ ब मध्ये विविध ठिकाणी रस्त्याचे डांबरीकरण करण्यास्तव रु. 29,99,790/— (अक्षरी एकोणतीस लक्ष नव्यानऊ हजार सातशे नव्वद फक्त) प्राकलनाास प्रशासकीय मंजुर प्रदान करण्याचा प्रश्न समितीने विचारात घेऊन त्यास एकमताने मंजूरी प्रदान केली.

<u>ठराव क्रमांक 286</u>:— प्रभाग क्र. 58 ब आदिवासी कॉलोनी, विश्वकर्मा नगर व डगलत रोड येथील रस्त्याचे रूंदीकरण व डांबरीकरण करण्याचे कामास्तव रू. 45, 97,747/— रकमेच्या प्राकलनास प्रशासकीय मंजूरी प्रदान करण्याचा प्रश्न समितीने विचारात घेऊन त्यास एकमताने मंजूरी प्रदान केली.

<u>ठराव क्रमांक 287</u>:— नागपूर महानगरपालिके मार्फत पेंच टप्पा —4— 115 द.ल. जलशुद्धीकरण केंद्र, गोधनी, हुडकेश्वर नरसाळा येथील वाढीव पाणीपुरवठा योजना पेंच—4—(भाग 1 ते 4) व नागपूर शहराचे सांडपाणी वर पूर्नचक्रीकरण व पूर्नवापर या प्रकल्पा अंतर्गत निर्माण होणारे दायित्वाकरीता एकूण रू. 100 कोटी कर्ज महाराष्ट्र अर्बन इन्फ्रास्ट्रक्चर कंपनी किंवा बँकेकडून उभारण्याबाबतच्या प्रस्तावास मंजूरी प्रदान करण्याबाबतचा प्रश्न समितीने विचारात घेऊन तसेच

उपरोक्त विषयाचे अनुषंगाने सादर करण्यात येते की, " नागपूर महानगरपालिके मार्फत पेंच टप्पा—4—115 द.ल.जलशुद्धीकरण केंद्र गोधनी प्रकल्प, हुडकेश्वर नरसाळा वाढीव पाणीपुरवठा योजना ( 20% म.न.पा. हिस्सा ), पेंच टप्पा—4( भाग 1 ते 4 ) अंतर्गत विकास कामे व नागपूर शहराचे सांडपाणीवर पूर्नचक्रीकरण व पूर्नवापर प्रकल्पाअंतर्गत (माहाजनकोचे दायित्व) या प्रकल्पाअंतर्गत खालील नमूद केलेल्या दायित्वाचे निर्वहन करण्यासाठी एकूण रू. 100 कोटी कर्ज महाराष्ट्र अर्बन इन्फ्रास्ट्रक्चर कंपनी किंवा बँकेकडून उभारण्याचे प्रस्तावित आहे.

( रू. कोटीमध्ये )

| अ.क्र. | प्रकल्पाचे नाव व दायित्व प्रकार | रक्कम ( रूपये ) |
|---|---|---|
| 1 | पेंच टप्पा – 4 – 115 द.ल. जलशुद्धीकरण केंद्र गोधनी अंतर्गत देयक व इएमआय (10 वर्षाकरीता ) | 50.00 |
| 2 | हुडकेश्वर नरसाळा वाढीव पाणीपुरवठा योजना ( 20% म.न.पा. हिस्सा ) | 12.00 |
| 3 | पेंच टप्पा – 4 ( भाग 1 ते 4 ) प्रकल्पाअंतर्गत विकास कामावरील दायित्व | 27.00 |
| 4 | नागपूर शहराचे सांडपाणीवर पूर्नचक्रीकरण व पूर्नवापर प्रकल्पाअंतर्गत दायित्व ( महाजनको ला द्यावयाची रक्कम ) | 11.00 |
| | **एकूण दायित्वासाठी उभारावयाची कर्जाची रक्कम** | **100.00** |

मनपा मार्फत सदर कर्ज उभारणीसाठी महाराष्ट्र अर्बन इन्फ्रास्ट्रक्चर कंपनी किंवा संबंधित बँकेच्या काही अटी/शर्ती असल्यास त्याबाबत मनपाचे आर्थिक हिताचे दृष्टीने अंतिम निर्णय घेण्याबाबत स्थायी समिती द्वारा मा. आयुक्त, म.न.पा. यांना प्राधिकृत करणे तसेच,

हया प्रस्तावास मनपा महासभेच्या मंजूरीनंतर महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम 2012 मधील कलम109 (ग)(दोन) अंतर्गत तरतुदीनुसार राज्य शासनाची मंजूरी आवश्यक आहे. सदर रू. 100 कोटी कर्ज उभारणीबाबतचा प्रस्ताव म.न.पा. महासभेसमोर मंजूरीकरीता सादर करण्यासाठी स्थायी समितीचे मंजूरीस्तव सादर केलेला प्रश्न समितीने विचारात घेऊन प्रस्तावित कर्ज उभारणीस एकमताने मंजुरी प्रदान करण्यात येते. तसेच प्रस्ताव म.न.पा. सभेसमोर मंजुरीकरिता एकमताने शिफारस करण्यास समितीने एकमताने मंजुरी प्रदान केली.

<u>ठराव क्रमांक 288</u>:— प्रभाग क्र. 31— अ मस्कासाथ मध्ये नमकगंज खापरी मोहल्ला, चुना ओली येथे सिमेंट रस्त्याचे बांधकाम करण्याच्या कामस्तव रू. 33,46,580/— (अक्षरी तेहत्तीस लक्ष छेचाळीस हजार पाचशे अंशी फक्त) प्राकलनास प्रशासकीय मंजूरी प्रदान करण्याचा प्रश्न समितीने विचारात घेऊन त्यास एकमताने मंजूरी प्रदान केली.

<u>ठराव क्रमांक 289</u>:— महाराष्ट्र शासन गृहनिर्माण विभाग, शासन निर्णय झोपधो—1001/प्र.क्र.125/14/झोपसु—1, दि. 22 जुलै 2014 मधील निर्णय क्र. 1 नुसार दि. 01.01.2000 अथवा त्यापूर्वी पासूनच्या संरक्षण पात्र झोपडीत दि. 01.01.2000 अथवा त्यापूर्वी पासून राहणाऱ्या झोपडपट्टीवासीयांची पात्रता तपासून ''जोडपत्र – तीन'' (जोडपत्र पाच सह) आणि दि. 01.01.2000 नंतरच्या दिनांकापासून सध्या राहत असलेल्या नागरिकांना ''जोडपत्र—चार (जोडपत्र पाचसह) नुसार अर्ज सादर करणे आणि शासन परिपत्रक दि. 12 ऑगस्ट 2014 च्या क्र. 3 मधील तरतूदी नुसार कार्यकारी अभियंता तथा सक्षम प्राधिकारी (स्लम), म.न.पा., नागपूर द्वारा, नागपूर शहरातील झोपडपट्टीवासीयांना ओळखपत्र (फोटोपास) तयार करुन पुरविण्याचे काम करण्याकरिता रु. 44,00,000/— (अक्षरी चौरेचाळीस लक्ष फक्त) खर्चाच्या सुधारित प्रस्तावास मान्यता प्रदान करणे व या कामाकरिता निविदा/अभिरुची प्रकटण (ई.ओ.आय.) द्वारा एजन्सीची नियुक्ती करुन काम करुन घेणे, यास

मान्यता प्रदान करण्याचा प्रश्न समितीने विचारात घेऊन त्यास एकमताने मंजूरी प्रदान केली तसेच,

दि. 01.01.2005 पर्यंत पात्र झोपडीला संरक्षण देण्यासाठी यामध्ये समावेश करण्यात यावा या सूचनेस मंजुरी प्रदान करण्यात आली. याबाबतचा स्वतंत्र प्रस्ताव प्रशासनाला म.न.पा. सभागृहाकडे मंजुरीस्तव सादर करावा. जेणेकरुन ही शिफारस राज्य शासनाकडे मंजुरीस्तव पाठविण्यात येईल यास समितीने एकमताने मंजुरी प्रदान केली.

ठराव क्रमांक 290:— प्रभाग क्र. 13—अ येथील बिनाकी पावर स्टेशन ते वैशाली नगर सिमेंट रोड टी पॉईंट पर्यंत रोडचे डांबरीकरण करण्याच्या कामास्तव निविदापैकी मे. आर.एम.दयारमानी यांची मूळ प्राकलनीय दरांपेक्षा प्रतिशत अधिक दराची रु. 29,35,165/— (अक्षरी एकोणतीस लक्ष पत्तीस हजार एकशे पासष्ठ फक्त) दराची निविदा मंजूर करण्याचा प्रश्न समितीने विचारात घेऊन मूळ प्राकलनिय दरापेक्षा 4.5 प्रतिशत अधिक दराची या दुरुस्तीसह विषयास समितीने एकमताने मंजूरी प्रदान केली.

ठराव क्रमांक 291:— प्रभाग क्र. 12 अ बाळाभाऊपेठ, वैशालीनगर व व्ही.एच. बी. कॉलनी येथील रस्त्याचे डांबरीकरण करण्याच्या कामास्तव प्राप्त 4 निविदा पैकी मे.एल.सी.गुरुबक्षाणी यांची मूळ प्राकलनीय दराची रु. 24,99,820/— (अक्षरी चोवीस लक्ष नव्याण्णव हजार आठशे वीस रुपये फक्त) रकमेची निम्नतम निविदा स्वीकृत करण्याबाबत यथायोग्य निर्णय घेण्याचा प्रश्न समितीने विचारात घेऊन त्यास एकमताने मंजूरी प्रदान केली.

ठराव क्रमांक 292:— प्रभाग क्र. 48 अ रेशीमबाग येथील जूनी शुक्रवारी, हेडगेवार बिडींग जवळील रस्त्याचे रूंदीकरण व डांबरीकरण करण्याचे कामास्तव रू. 43,22,389/— रकमेच्या प्राकलनास प्रशासकीय मंजूरी प्रदान करण्याचे प्रश्न समितीने विचारात घेऊन त्यास एकमताने मंजूरी प्रदान केली.

ठराव क्रमांक 293:— प्रभाग क्र. 54—ब येथील हिलटॉप, यशवंत नगर, वर्मा ले—आऊट, अंबाझरी ले—आऊट, न्यु वर्मा ले—आऊट येथील रस्त्याचे डांबरीकरण व रुंदीकरण करण्याच्या कामास्तव रु. 30,21,327/— (अक्षरी तीस लक्ष एकवीस हजार तीनशे सत्तावीस फक्त) प्राकलनास प्रशासकीय मंजुरी प्रदान करण्याचा प्रश्न समितीने विचारात घेऊन त्यास एकमताने मंजूरी प्रदान केली.

ठराव क्रमांक 294:— प्रभाग क्र. 18—ब नाईकवाडी बांग्लादेश बाहुली विहिर रोड व माहुरकर पेंटर अप्रोच रोडला सिमेंट कॉंक्रीट रस्त्याचे कामास्तव रु. 49,89,886/— (अक्षरी एकोनपन्नास लक्ष एकोणनव्वद हजार आठसे छयांशी फक्त) प्राकलनास प्रशासकीय मंजुरी प्रदान करण्याचा प्रश्न समितीने विचारात घेऊन त्यास एकमताने मंजूरी प्रदान केली.

<u>ठराव क्रमांक 295</u>:— प्रभाग क्र. 10 ब, मेकोसाबाग मधील ख्रिश्चन कॉलनी येथील रस्त्याचे डांबरीकरण करण्यास्तव रू. 29,99,063/— (अक्षरी एकोणतीस लक्ष नव्यानऊ हजार त्रेसष्ठ फक्त) प्राकलनास जुने पद क्रमांक 681 व नवीन पद क्र. A22001330802 अंतर्गत प्रशासकीय मान्यता प्रदान करण्याच्या तसेच हे काम रितसर निविदा मागवून हाती घेण्याचा प्रश्न समितीने विचारात घेऊन त्यास एकमताने मंजूरी प्रदान केली.

<u>ठराव क्रमांक 296</u>:— 1857 प्रथम स्वतंत्रता संग्राम 150 वी वर्षगांठ निमित्त गांधीबाग बगीचा येथे स्मारकाच्या निर्मितीच्या सुरू असलेल्या कामाची दर्शक क्षमता वाढवावयाची असल्याने जून्याच (2012—13) CSR दरावर आधारीत सुधारीत रू. 153,94,556.00 प्राकलन तयार केले असून त्यास मा. अधिक्षक अभियंता यांचे दि. 22.09.2015 चे आदेशान्वये तांत्रिक मान्यता आहे. या कामात खालील कामे अंतर्भुत आहेत.

| | | |
|---|---|---|
| (अ) | ओपन थिएटर व अन्य स्थापत्य कामे | — रू. 1,25,58,332.00 |
| (ब) | सौदर्यीकरण | — रू. 9,00,000.00 |
| (क) | विद्युत व्यवस्था | — रू. 10,00,000.00 |
| (ड) | लॅण्डस्केप | — रू. 4,66,760.00 |
| **(इ)** | प्रकल्प व्यवस्थापन फी | — रू. 4,69,464.00 |
| | **एकुण —** | **रू. 1,53,94,556.00** |

या कामाचे जुने रू. 1,17,49,495 चे प्राकलनास स्थायी समिती ठराव क्र. 401 दि. 11.02.2013 अन्वये प्रशासकीय मान्यता आहे त्याची दर्शक क्षमता वाढवावयाची असल्याने वाढीव कामाकरिता पद क्र. A 46701373519 (जुने पद क्र. 663) अंतर्गत वाढीव रू. 36,50061.00 प्रावधानासह रूपये ,1,53,94,556.00 चे सुधारीत प्राकलनास प्रशासकीय मान्यता, तसेच या कामाचे कंत्राटदार मे. एस. जे. शर्मा यांना वाढीव कामाकरिता जुन्याच मंजुर दरावर प्राकलनिय दरापेक्षा 0.51 टक्के ने कमी रू. 35,61,370.00 चे व प्रकल्प सल्लागार मे. लेट्स बिल्ड यांना वाढीव रकमेपर्यंत काम करण्यास मंजुरी प्रदान करण्याचा प्रश्न समितीने विचारात घेऊन त्यास एकमताने मंजूरी प्रदान केली.

<u>ठराव क्रमांक 297</u>:— प्रभाग क्र. 31—अ मध्ये विविध ठिकाणी सिमेंट कॉंक्रीट रस्त्याचे बांधकाम करण्याच्या कामास्तव तयार केलेल्या रु. 43,70,220/— (अक्षरी त्रेचाळीस लक्ष सत्तर हजार दोनशे वीस फक्त) रकमेच्या प्राकलनास पद क्र. A22001330802 अंतर्गत प्रशासकीय मान्यता प्रदान करण्यास व हया कामाचे न्युनतम दराचे निविदाकार मे. हितेश कंस्ट्रक्शन यांची मूळ प्राकलनीय दरांपेक्षा 26.75 प्रतिशत कमी दराची रु. 32,01,186/— (अक्षरी बत्तीस लक्ष एक हजार एकशे छयांशी फक्त) दराची निविदा मंजूर करण्याचा प्रश्न समितीने विचारात घेऊन त्यास एकमताने मंजूरी प्रदान केली.

<u>**ठराव क्रमांक 298**</u> :– आजच्या सभेची कार्यवाही कायम करण्यास समितीने एकमताने मंजुरी प्रदान केली.

यानंतर मा. सभापती स्थायी समिती यांनी सभेची कार्यवाही अनिश्चित काळाकरिता स्थगित केली.

निगम सचिव<br>महानगरपालिका,नागपूर

सभापती<br>स्थायी समिती,<br>महानगरपालिका,नागपूर